# आत्मनिर्भर भारत
# भाग-4
# प्रगतीची नवी क्षितीजे 16.05.2020

सत्यमेव जयते
Government Of India



# गुंतवणुकीलागती देण्यासाठी धोरणात्मक सुधारणा

- आत्मनिर्भर भारताच्या दिशेने प्रयत्न
- सक्षम सचिव समूहाच्या (EGoS) माध्यमातून गुंतवणूकसंबंधित मंजुरी गतिमान करणे
- गुंतवणूकप्रकल्प आखणी, गुंतवणूकदारआणि केंद्र/राज्य सरकारांशी समन्वय राखण्यासाठी प्रत्येक मंत्रालयात प्रकल्प विकास विभाग
- नवीन गुंतवणुकींसाठीस्पर्धा करण्यासाठी गुंतवणूक आकर्षकतेच्या आधारे राज्यांचे मानांकन
- सोलर पीव्ही निर्मिती, प्रगत सेल बॅटरी स्टोरेज यांसारख्या क्षेत्रात नवीन चॅम्पियन क्षेत्रांच्या प्रोत्साहनासाठी प्रोत्साहनपर योजना सुरु करणार



# औद्योगिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा

- औद्योगिक क्लस्टरमध्ये सामान्य पायाभूत सुविधा आणि जोडणीसाठी आवश्यक सुधारणेकरिता ही योजना राज्यांमध्ये आव्हानात्मक स्वरूपात राबविली जाईल.
- नवीन गुंतवणूकीसाठी औद्योगिक जमीन, लँड बँकची उपलब्धता आणि जीआयएस मॅपिंगद्वारे औद्योगिक माहिती प्रणालीवर माहिती उपलब्ध करुन देणे.
- औद्योगिक माहिती प्रणालीवर 5 लाख हेक्टरवर 3376 औद्योगिक पार्क/ औद्योगिक वसाहत/ सेझ ची माहिती
- 2020 -2021 मध्ये सर्व औद्योगिक पार्कचे मानांकन होणार



सत्यमेव जयते
Goverment Of India



# प्रगतीची नवी क्षितीजे

# धोरणात्मक सुधारणा : कोळसा क्षेत्रात व्यावसायिक खाणकामाची सुरुवात

- कोळसा निर्यात कमी करुन कोळसा निर्मितीमध्ये स्वयंपूर्णता वाढविणे.
- खालील माध्यमातून सरकार कोळसा क्षेत्रात स्पर्धा, पारदर्शकता व खाजगी क्षेत्र सहभाग यांची सुरुवात करेल:
- निश्चित रुपया/टन याऐवजी महसूल भागीदारी व्यवस्था
- पूर्वी केवळ भांडवली ग्राहक लिलावात भाग घेऊ शकत असत.
- आता कोणताही गट कोळसा खाणीसाठी लिलावात भाग घेऊ शकेल आणि खुल्या बाजारात विकू शकेल.
- प्रवेश प्रक्रियेत मोकळीक दिली जाईल.
- सुमारे 50 खाणी त्वरित उपलब्ध करुन दिल्या जातील.
- यामध्ये पात्रता अट नसेल.



# धोरणात्मक सुधारणा-कोळसा क्षेत्रात व्यावसायिकरणाची सुरुवात

- अंशतः शोधलेल्या खाणींमध्ये शोधन-तथा-उत्पादन
- पूर्वी फक्त पूर्ण शोधीत खाणींचाच लिलाव केला जात असे, आता अंशतः शोधीत खाणींचाही लिलाव होणार
- संशोधनासाठी खासगी क्षेत्राची मदत
- नियोजित वेळेपेक्षा उत्पादनासाठी महसूलात सुट रुपाने सवलत मिळणार



# धोरणात्मक सुधारणा -कोळसा क्षेत्रात वैविध्यपूर्ण संधी - 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक

- महसूल हिश्श्यात सवलत देऊन कोळसा गॅसिफिकेशन / द्रवीकरणला प्रोत्साहन
- पर्यावरणीय प्रभाव लक्षणीयरीत्या कमी होईल
- भारताला वायू-आधारित अर्थव्यस्थेकडे वळवण्यात मदत करेल
- 50 हजार कोटी रुपयांचा पायाभूत विकास
- 2023-24 पर्यंत 1 अब्ज टन कोळशाचे उत्पादन गाठण्याचे सीआयएलचे वाढीव उद्दिष्ट आणि खासगी कोळसा क्षेत्रातून कोळसा उत्पादन
- खाणींमधून रेल्वे सायडिंगला कोळशाच्या यांत्रिक वाहतुकीसाठी 18 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक समाविष्ट
- या उपायांमुळेही पर्यावरणीय प्रभाव कमी होण्यास मदत होईल



# धोरणात्मक सुधारणा-कोळसा क्षेत्रात उदारीकृत प्रणाली

- कोल इंडिया लिमिटेड च्या कोळसा खाणीतून कोळसा बेड मिथेनच्या उत्खननासाठीचे अधिकार लिलावाद्वारे
- खाण योजना सरलीकरणसारख्या व्यवसाय सुलभीकरण उपाययोजना
- ऑनलाईन माल भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी खाण योजना संक्षिप्त केली आहे
- वार्षिक उत्पन्नात आपोआप 40 % वाढीला मान्यता
- ग्राहकांना दिलेल्या वाणिज्यिक अटींमध्ये सवलती (5000 कोटी रुपयांची सवलत)
- ऊर्जा ग्राहक नसलेल्यांच्या लिलाव प्रक्रियेत पत अटींमध्ये राखीव किमतीत घट आणि उचलण्याच्या कालावधीत वाढ



# खनिज क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन

- खालील माध्यमातून प्रगती, रोजगार व स्थानिक तंत्रज्ञान यांना चालना देण्यासाठी रचनात्मक क्रांती:
- एक अखंड संमिश्र शोध-खाणकाम-उत्पादन प्रणाली सुरु केली जाईल.
- खुल्या व पारदर्शक पद्धतीने 500 खाणींचा लिलाव केला जाईल.
- बॉक्साईटआणि कोळसा खाणीचा संयुक्तपणे लिलाव पद्धतीची सुरुवात केल्यामुळे अल्युमिनियम उद्योगात स्पर्धात्मकता वाढली. वीज खर्चात बचत होणार



# धोरणात्मक सुधारणा- खाण क्षेत्र

- बंदिस्त आणि बंदिस्त नसलेल्या खाणींच्या खनिजपट्ट्यांच्या हस्तांतरणांसाठीचे भेद दूर केले आणि अतिरिक्त वापराविना असलेले खनिजाच्या विक्रीस परवानगी, ज्यातून खनिज उत्पादनाबाबत कार्यक्षमता आणि उत्पादन वाढले.
- .खाण मंत्रालयाकडून विविध खनिजांसाठी खनिज निर्देशांक जाहीर करण्याची प्रक्रीया सुरु आहे.
- खनिजपट्ट्याच्या हस्तांतरणावेळी भराव्या लागणाऱ्या स्टॅम्प ड्युटीचे सुसूत्रीकरण



# संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्णता वाढवणे

- संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी 'मेक इन इंडिया'
- वर्षनिहाय मुदतीसह आयातीवर निर्बंध असलेल्या शस्त्रास्त्रे/प्लॅटफॉर्म्सची सूची अधिसूचित करणे
- आयात केल्या जाणाऱ्या सुट्या भागांची देशात निर्मिती
- देशातंर्गत भांडवल खरेदीसाठी वेगळी अर्थसंकल्पीय तरतूद
- -संरक्षण सामुग्रीच्या आयातीवरील खर्चात मोठी बचत शक्य होईल
- ऑर्डनन्स फॅक्टरी बोर्डाचे कार्पोरेटायझेशन करून शस्त्रास्त्रे पुरवठ्यात स्वायत्तता, दायित्व आणि कार्यक्षमता सुधारणे




# धोरणात्मक सुधारणा- संरक्षण उत्पादन

- संरक्षण उत्पादनात स्वयंचलित पद्धतीने थेट परदेशी गुंतवणुकीचीमर्यादा 49 % वरून 74 % वर
- कालबद्ध संरक्षण खरेदी प्रक्रिया आणि वेगवान निर्णय घेण्याची प्रक्रिया खालील पद्धतीने सुरू होईल
- कंत्राट व्यवस्थापनास समर्थन देण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन युनिटची स्थापना
- सामान्य कर्मचाऱ्यांची शस्त्रे / प्लॅटफॉर्मच्या गुणात्मक आवश्यकतांची वास्तववादी रचना
- यंत्र सामुग्रीची डागडुजी आणि चाचणी प्रक्रिया








# नागरी उड्डाणांमध्ये कार्यक्षम हवाई क्षेत्र व्यवस्थापनातून उड्डाण मूल्य रुपये 1000 कोटींमध्ये बचत करणे

- केवळ 60% भारतीय हवाई क्षेत्र मोफत उपलब्ध
- भारतीय हवाई क्षेत्र वापराचे निर्बंध शिथिल केले जातील, ज्यामुळे नागरी उड्डाणे अधिक कार्यक्षम होतील.
- यामुळे उड्डाण क्षेत्रात दरवर्षी एकूण रुपये 1000 कोटींचा लाभ मिळेल.
- हवाई क्षेत्राचा योग्य वापर करुन इंधन व वेळेत बचत होईल.
- याचे सकारात्मक पर्यावरणीय परिणाम होतील



# सार्वजनिक खासगी भागीदारीच्या माध्यमातून आणखी जागतिक दर्जाची विमानतळ

- भारतीय विमानतळ प्राधीकरणाला सार्वजनिक खासगी भागीदारीच्या माध्यमातून झालेल्या लिलावात 6 पैकी 3 विमानतळ चालवण्यासाठी आणि देखभालीसाठी मिळाले आहेत.
- 6 विमानतळांचा वार्षिक महसूल पहिल्या टप्प्यात – रु. 1000 कोटी (सध्याच्या प्रतिवर्ष 540 कोटी रुपयांवरुन). भारतीय विमानतळ प्राधीकरणाला डाऊन पेमेंटच्या माध्यमातून 2300 कोटी रु. मिळणार.
- दुसऱ्या टप्प्यासाठी आणखी 6 विमानतळांची निवड केली जाणार. लवकरच लिलाव प्रक्रीया सुरु होईल.
- 12 विमानतळांमध्ये खासगी गुंतवणूकदारांकडूनपहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात 13,000 कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक अपेक्षित.
- आणखी 6 विमानतळ लिलावाच्या तिसऱ्या फेरीसाठी ठेवणार



## विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि तपासणीसाठी (एम आरओ) भारत जागतिक केंद्र बनणार

- एमआरओ व्यवस्थेसाठी कर पद्धतीचे सुसूत्रीकरण
- विमानाच्या भागांची दुरुस्ती आणि विमानाच्या देखभालीवरील खर्च तीन वर्षात ८०० कोटी रुपयांवरून २ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढणार
- जगभरातील प्रमुख इंजिन उत्पादक आगामी काळात भारतात इंजिन दुरुस्ती सुविधा उभारणार
- खर्चात बचत करण्यासाठी संरक्षण क्षेत्र आणि नागरी
- एमआरओ दरम्यान एककेंद्रभिमुखता साधणार
- विमान कंपन्यांचा देखभाल खर्च कमी होईल
-



# शुल्क धोरण सुधारणा

**ऊर्जा क्षेत्रात पुढील सुधारणा केल्या जातील**

अ ) ग्राहकांचे अधिकार

- डिस्कॉमची ( वीज वितरण कंपनी) अकार्यक्षमता ग्राहकांवर ओझे होऊ नये
- सेवांचे मानक आणि डिस्कॉम्ससाठी संबंधित दंड
- डिस्कॉम्सने पुरेशी उर्जा सुनिश्चित करावी, भारनियमनावर दंड आकारला जाईल

ब) उद्योगास चालना

- दोन्हीकडून मिळणाऱ्या अनुदानात उत्तरोत्तर कपात
- खुल्या प्रवेशास कालबद्ध मंजुरी
- निर्मिती आणि पारेषण प्रकल्प विकासकांची स्पर्धात्मक निवड

क) क्षेत्राची शाश्वतता

- कोणतीही नियामक मालमत्ता नाही
- जेनकोचे ( वीज निर्मिती कंपनी) वेळेवर देयक चुकते करणे
- अनुदानासाठी थेट लाभ हस्तांतरण, स्मार्ट प्रीपेड मीटर



## केंद्र शासित प्रदेशात वितरणाचे खाजगीकरण

- ऊर्जा वितरण व पुरवठा यांची क्षमतेहून कमी कामगिरी
- केंद्र शासित प्रदेशातील ऊर्जा विभागांचे खाजगीकरण केले जाईल.
- यामुळे ग्राहकांना अधिक चांगली सेवा मिळेल व वितरणातील आर्थिक तसेच कार्यरत कार्यक्षमता सुधारेल.
- देशातील इतर विभागांसमोर अनुकरणीय आदर्श उभा राहिल.



## सामाजिक पायाभूत क्षेत्रांमध्ये सुधारीत व्यवहार्यता तफावत निधी पुरवठा योजनेच्या माध्यमातून- रु 8100 कोटी

- सामाजिक पायाभूत क्षेत्राला अव्यवहार्यतेचा फटका बसतो
- सरकार व्यवहार्यता तफावत निधी पुरवठा वाढवून केंद्र आणि राज्य/वैधानिक संस्थासाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या 30% करणार
- इतर क्षेत्रासाठी केंद्र सरकार आणि राज्य वैधानिक संस्थांसाठी 20% व्हीजीएफ मदत सुरु राहणार.
- एकूण आराखडा 8100 कोटी रुपयांचा
- प्रकल्पांचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालये/राज्य सरकारे/वैधानिक संस्थांकडून.
-



# अंतराळ कार्यक्रमात खासगी सहभागाला चालना देणे

- भारताच्या अंतराळ क्षेत्रातील प्रवासात भारतीय खासगी क्षेत्र सह-प्रवासी असेल
- उपग्रह, प्रक्षेपण  आणि अंतराळ-आधारित सेवांमध्ये खासगी कंपन्यांना समान संधी पुरवणार
- खासगी कंपन्यांना अंदाज वर्तवण्यायोग्य धोरण आणि नियामक व्यवस्था पुरवणार
- खासगी क्षेत्राला त्यांची क्षमता सुधारण्यासाठी  इसरोच्या सुविधा आणि अन्य  संबंधित मालमत्ता वापरायची अनुमती दिली जाणार
- ग्रहीय शोध , बाह्य अंतराळ मोहीम सारखे भविष्यातील प्रकल्प खासगी क्षेत्रासाठी खुले करणार
- तंत्र-उदयोजकांना रिमोट सेन्सिंग डेटा पुरवण्यासाठी उदार भौगोलिक माहिती धोरण



# अणुऊर्जेशी संबंधित सुधारणा

- वैद्यकीय समस्थानिकांच्या उत्पादनासाठी पीपीपी मोड ( खाजगी सरकारी भागीदारी)मध्ये संशोधन अणुभट्टीची स्थापना - कर्करोग आणि इतर रोगांसाठी परवडणाऱ्या उपचारांच्या माध्यमातून मानवतेच्या कल्याणासाठी प्रोत्साहन
- अन्न बचतीसाठी किरणोत्सर्गी तंत्रज्ञान वापरण्यासाठी पीपीपी मोडमध्ये सुविधा निर्माण करणार- कृषीविषयक सुधारणा करून शेतकऱ्यांना मदत
- परमाणू क्षेत्रात भारताच्या स्टार्ट अपना प्रवेश- संशोधन सुविधा व तंत्रज्ञान उद्योजक यांच्यात समन्वय साधण्यासाठी तंत्रज्ञान विकास केंद्रे  स्थापित केली जातील
- 





सत्यमेव जयते
Goverment Of India

# धन्यवाद